# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-४०/२०२५ दिनांक- २७/०१/२०२५

## प्रेस नोट

### प्रजासत्ताक दिनानिमित्ताने हरवलेले ८,२५,०००/- रुपये किंमतीचे ५५ मोबाईल फोन शोधुन तक्रारदार यांना परत देण्यास पेल्हार पोलीसांना यश.

----०००----

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत जास्त प्रमाणात मोबाईल फोन हरविल्याच्या तक्रारी प्राप्त होत असल्याने सदर हरविलेल्या मोबाईल फोनचे शोध घेणेबाबत मा. वरिष्ठांकडुन सुचना प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषांगाने पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मा.श्री. जितेंद्र वनकोटी, यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या अधिकारी अंमलदार यांना हरविलेल्या मोबाईल फोनचे शोध घेणेबाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी पेल्हार पोलीस ठाणे हद्दीतुन मागील दोन ते तीन महिन्यापुर्वी हरविलेल्या/गहाळ झालेल्या विविध कंपन्यांचे मोबाईल फोनची माहिती घेऊन तांत्रिक माहितीच्या विश्लेषनाचे आधारे हरविलेल्या मोबाईल फोनबाबत अधिक चौकशी केली असता वेगवेगळे तक्रारदार यांचे ८,२५,०००/- रुपये किंमतीचे एकुण ५५ मोबाईल फोनचे शोध घेऊन ते २६ जानेवारी २०२५ रोजीचे प्रजासत्ताक दिनानिमित्त तक्रारदार यांना परत देण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी मा.श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ- ३, विरार, मा.श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ठाण्याचे मा.श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, मा.श्रीमती. डी.एन.चौधरी पोलीस निरीक्षक (गुन्हे), मा.श्री. शकिल शेख, पोलीस निरीक्षक (प्रशासन), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/रमेश वाघचौरे, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, मिथुन मोहिते, पो.अं./रवि वानखेडे, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अभिजित नेवारे, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील, वसीम शेख, नेम. पेल्हार पोलीस ठाणे तसेच पोहवा/नामदेव ढोणे, पो. अं. सोहेल शेख, नेम. पोलीस उप आयुक्त कार्यालय परिमंडळ ०३, मि.भा.व.वि पोलीस आयुक्तालय यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.








------ooooo-----